




दैनिक
# मराठवाडा पत्र

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक ३०५ •गुरूवार,दि.०५ फेब्रुवारी २०२६ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये



• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955




# बीड शहरात उभारणार स्व.अजितदादांचा पुर्णाकृती पुतळा : आ. विजयसिंह पंडित

## शोकाकुल वातावरणात स्व.अजितदादा पवार यांच्या अस्थीकलशाचे बीडकरांनी घेतले दर्शन










**गेवराई । प्रतिनिधी**

बीड येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा कार्यालयात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांचा अस्थीकलशन दर्शनासाठी ठेवण्यात आला होता. यावेळी शोकाकुल वातावरणात अस्थीकलशाचे दर्शन घेताना लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि बीडकरांचे डोळे पानावले. यावेळी अतिशय जड अंतःकरणाने उपस्थितांनी अस्थीकलशाचे दर्शन घेताना माना झुकवल्या. दुपारी २ वाजेपर्यंत राष्ट्रवादी कार्यालयात अस्थीकलश ठेवण्यात आला होता. त्यानंतर आ. विजयसिंह पंडित अस्थीकलश घेऊन श्री क्षेत्र राक्षसभुवन (शनिचे) येथे रवाना झाले. शोकाकुल वातावरणात अस्थी विसर्जन होताना उपस्थितांनी अजितदादा अमर रहेच्या घोषणा दिल्या. आपला लाडका नेता आपल्याला सोडून गेल्याची भावना प्रत्येकाने यावेळी व्यक्त केल्या. यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, महाराष्ट्राचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांचे अकस्मिक दुःखन निधन झाले. स्व.अजितदादांच्या जाण्याने महाराष्ट्रावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ▶ उर्वरित पान २ वर



## श्री सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर बार्शी रोड बीड येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील नामांकित असलेल्या बार्शी रोडवरील श्री सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशन या ठिकाणी सालाबाद प्रमाणे याही वर्षी अतिशय थाटामाटा मध्ये आणि मोठ्या धुमधडाक्यात महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकाराच्या कीर्तनाने या ठिकाणी सप्ताह सुरुवात होणार आहे तरी पंचक्रोशीतील सर्व बीड जिल्ह्यातील सर्व भाविक भक्तांनी येथे होणाऱ्या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन श्री सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशनचे अध्यक्ष नवनाथ शिराळे पाटील व सर्व विश्वस्त यांनी केले आहे. नवनाथ आण्णा शिराळे (पाटील) (अध्यक्ष) चे. ९८२२८७५९४५, पांडुरंग जानवळे चे.९७६७७८८४४८, श्रीमती राजची प्रदिप बाव्रस श्री. सदाशिव शेजाळ, बाबासाहेब शिदे, प्रधान पवार, चौहरी वाघमारे, दोडके सर, हरिदास जोगदंड, महादेव आंधळकर सर, ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड शहरासाठी बिंदुसरा प्रकल्पातून नवीन पाणी पुरवठा योजना राबवावी

## भाजप गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागरांसह शिष्टमंडळाची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील सध्याचा विस्कळीत पाणीपुरवठा, उन्हाळ्यात दरवर्षी भेडसावणारी पाणीटंचाई, पुरवठ्याच्या नियोजनातील त्रुटी आणि येत्या उन्हाळ्यातील संभाव्य अडचणी लक्षात घेऊन आता बीड शहरासाठी बिंदुसरा प्रकल्पातून नवीन अतिरिक्त पाणीपुरवठा योजना तातडीने प्रस्तावित



करून कामांना गती द्यावी, अशी मागणी भाजपच्या गटनेत्या व नगरसेविका डॉ.सारिकाताई योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेऊन मंगळवारी (दि.३) केली. या मागण्यांवर जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. सध्या बीड शहराला बिंदुसरा प्रकल्पातून अंशतः पाणीपुरवठा होत असून तो पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● मालमत्ता नोंदणी मोहिमेसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी

**बीड शहराचा झपाट्याने विस्तार होत असून नव्या मालमत्तांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या सर्व मालमत्तांची नोंद नगरपरिषदेच्या अभिलेखात असणे आवश्यक असल्याने व्यापक मालमत्ता नोंदणी (असेसमेंट) मोहीम राबविण्यासाठी विशेष निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी भाजपच्या गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केली आहे. मालमत्ता नोंदणी पूर्ण झाल्यास नगरपरिषदेचा महसूल वाढून शहरातील विविध विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध होण्यास मदत होईल. या मोहिमेसाठी सुमारे एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.**

# मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वेवरील वाहतूक कोंडीनंतर सरकार ॲक्शन मोडमध्ये; एकनाथ शिंदेंचे दोन मोठे आदेश, 'टोल थांबवा अन् मिसिंग लिंक...'

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर बोरघाटात गॅस टँकरच्या अपघातामुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होऊन वाहन चालकांना झालेल्या त्रासाची गंभीर दखल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली आहे. पुढील काळात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही यासाठी विशेष आपत्कालीन वाहतूक आराखडा मुंबई पुणे द्रुतगती महामार्गासाठी तयार करण्याचे निर्देश एमएसआरडीसी आणि पोलिसांना दिले आहेत.



गॅस टँकर उलटल्यामुळे ज्वलनशील प्रोपोलीन गॅसची गळती सुरू झाली होती. या गळतीमुळे धोका आणखी वाढून मोठे नुकसान झाले असते त्यामुळे वाहतुकीचे नियोजन करण्याशिवाय पर्यायच नव्हता. त्यामुळे द्रुतगती महामार्गावरील वाहतूक जुन्या महामार्गाकडे वळवावी लागली. शिवाय एमएसआरडीसी आणि पोलिसांनी अथक २० तास प्रयत्न करून गॅस गळती सुद्धा रोखली असं एकनाथ शिंदेंनी सांगितलं आहे.

प्रवाशांना झालेला त्रास दुर्दैवी आहे. त्यांना झालेल्या मनस्तापाची पूर्ण कल्पना आहे. पण एमएसआरडीसीने सुद्धा तातडीने राष्ट्रीय ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड जिल्हयामध्ये इयत्ता १० वी व इ.१२ वी परीक्षेसाठी कॉपीमुक्त अभियान राबवावे: जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**बीड । प्रतिनिधी**

दक्षता समितीची बैठक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, यांच्या अध्यक्षतेखाली दि.०३ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात आली. या बैठकीसाठी सर्व समिती सदस्य उपस्थित होते. तसेच दूरदृश्य प्रणालीव्दारे तहसिलदार, गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीत जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक परीक्षा केंद्रावरील प्रत्येक वर्गखोलीत CCTV कैमेरे



बसवून ते कार्यान्वयीत करावेत, संवेदनशील परीक्षा केंद्रावर आवाजाचे रेकॉर्डींग होणारे CCTV कैमेरे बसवावेत, त्याची तपासणी तहसिलदार, गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांनी पुढील दोन दिवसात करावी व त्याचा अहवाल सादर करावा, तसेच CCTV कैमेऱ्यांचे ॲक्सेस जिल्हास्तरावर कंट्रोल रुम स्थापन करून तेथे घेण्यात यावेत, संवेदनशील परीक्षा केंद्रावरील आणि ज्या परीक्षा केंद्रातील वर्ग खोलीमध्ये उउढत कॅमेरे नसतील, तेथील केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित इतर कर्मचारी यांची अदलाबदल करावी, परीक्षाकेंद्रावर नियुक्त कर्मचा-या ▶▶ उर्वरित पान २ वर



*खासदार श्रीकांतजी शिंदे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री तथा सामाजिक न्यायमंत्री संजयजी सिरसाट साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत युवासेना जिल्हाप्रमुख गणेश (भैय्या) शिराळे यांच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात आले, यामध्ये बीडमधील प्रसिद्ध ऐतिहासिक कंकालेश्वर मंदिर येथे मा. श्रीकांतजी शिंदे साहेबांच्या दिर्घायुष्यासाठी दुग्धाभिषेक करण्यात आला त्यानंतर,युवासेना जिल्हाप्रमुख गणेश(भैय्या) शिराळे यांच्या मार्गदर्शनाखाली युवा सेनेच्या वतीने १००१ वृक्षारोपण करण्यात आले. तसेच दरवर्षी एकनाथजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रम महाकरंडक चंपावती महोत्सव बीड, या कार्यक्रमात भाग घेण्यासाठी जिल्हाभरातून उपस्थित राहिलेल्या सर्व विद्यार्थ्यांना युवासेना जिल्हाप्रमुख गणेश(भैय्या) शिराळे यांच्या वतीने शालेय साहित्य वाटप करण्यात आले, याप्रसंगी छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री तथा सामाजिक न्यायमंत्री संजयजी सिरसाट साहेब, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर, चंद्रकांत नवले, उपनेत्या संगिताताई ठोंबरे, दैनिक पार्श्वभूमीचे संपादक गंमत भंडारी ,युवासेना मराठावडा प्रमुख सागर बहिर, युवासेना विधानसभा प्रमुख तथा (नगरसेवक बीड) सुरज चुंगडे, युवासेना माजलगाव जिल्हा प्रमुख रविराज बडे, गेवराई युवासेना जिल्हा प्रमुख अजय सुरवसे, संघटक ऋषिकेश जोगदंड, तसेच शिवसेनेचे व युवासेनेचे बीड जिल्ह्यातील पदाधिकारी आणि रौद्रशंभू युवा प्रतिष्ठानचे कार्यकर्ते उपस्थित होते.*

# २०२९ ला बीडचा आमदार अनिल जगतापच असायला हवा: ना. संजय शिरसाट

## मंत्री संजयजी शिरसाट यांच्या उपस्थितीत चंपावती महोत्सवाचा भव्य उद्घाटन सोहळा संपन्न



### ● चंपावती भूषण पुरस्काराने सन्मान

**चंपावती महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्य करणाऱ्या मान्यवरांचा 'चंपावती भूषण पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला. यावेळी डॉ. विनिता ढाकणे यांना शैक्षणिक व आरोग्यसेवेसाठी, प्रणिता गंगाखेडकर (शिक्षण विस्तार अधिकारी) यांना जिल्हा परिषद शाळेच्या आदर्शवत कार्यासाठी, शेख अजहर यांना क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल, नितीन कोटेचा यांना उद्योजक तसेच सामाजिक क्षेत्रातील आदर्शवत कार्याबद्दल आणि मनोज धस यांना शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल चंपावती भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या सांस्कृतिक क्षेत्राला नवी दिशा देणारा चंपावती महोत्सव सध्या संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेत असून बीडची सकारात्मक ओळख निर्माण करण्यात महोत्सव महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री नामदार संजयजी शिरसाट यांनी केले. चंपावती महोत्सवाच्या भव्य उद्घाटनप्रसंगी बोलताना ना. शिरसाट म्हणाले की, अनिलदादा जगताप यांनी राजकारणाचे जोडे बाजूला ठेवून समाजकारण, क्रीडा आणि सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य करत सर्व सामान्य जनतेचे आजवर भले केले आहे. बीडच्या प्रतिमेत बदल घडवून आणण्यासाठी त्यांचे योगदान मोलाचे आहे. त्यामुळे २०२९ मध्ये बीडचा आमदार अनिल जगतापच असायला हवा, असे आवाहन त्यांनी उपस्थित बीडकरांना केले. अनिलदादा जगताप फाउंडेशन व बीड शिवसेना आयोजित चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक २०२६ या स्पर्धेचा भव्य उद्घाटन सोहळा दि. ४ फेब्रुवारी रोजी उत्साहात पार पडला. या वेळी शिवसेनेच्या उपनेत्या संगीता ठोंबरे, दै. पार्श्वभूमीचे संपादक गंमत भंडारी, दै. दिव्य लोकप्रभाचे संतोष मानूरकर, ▶▶ उर्वरित पान २ वर




# 'व्हॅलेंटाईन वीक' – युवावर्गाचे नैतिक अध:पतन करणारा सप्ताह

'प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं.. तुमचं आणि आमचं अगदी सेम असतं !' असे मंगेश पाडगावकरांनी कवितेतून सांगितले असले तरी हल्लीच्या प्रेमात सुद्धा बरेच प्रकार तयार झाले आहेत. सकाम आणि निष्काम प्रेम हे त्यातील मुख्य प्रकार. आपल्यावर प्रेम आहे म्हणणारी व्यक्ती आपल्यावर निष्काम प्रेम करते कि त्यामागे तिचा काही हेतू दडला आहे हे ओळखणे आजच्या काळात अत्यावश्यक बनले आहे. प्रेमातील फसवणुकीची प्रकरणेही हल्ली वाढली आहेत. यामध्ये बऱ्याचदा बळी जातो तो मुलीचा. प्रेमात फसवणूक झाल्याने दरवर्षी कितीतरी मुलींचे आयुष्य उध्वस्त होते, तर कितीतरी जणी निराश होऊन मृत्यूला कवटाळतात. मुलींचे मनच मुळात भावनाशील असल्याने प्रेमात अशाप्रकारे वर्गवारी करणे प्रत्येकीला जमतेच असे नाही. मुलींच्या याच कमजोरीचा गैरफायदा घेणारे, तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिची फसवणूक करणारे, तिच्या भावनांशी खेळणारे राक्षसीप्रवृत्तीची माणसे आज चोहोबाजूंनी पसरलेली आहेत, त्यामुळे आता मुलींना प्रेमात आंधळे होणे परवडणारे नाही. काहीजण म्हणतील प्रेम केले जात नाही, तर ते आपसूकच होते. असे असेल, तर दरवर्षी ७ ते १४ फेब्रुवारी या सात दिवसांत तरुणवर्गामध्ये उत्साहाने साजरा केला जाणारा 'व्हॅलेंटाईन वीक'चा उहापोह कशासाठी ? हा सप्ताह नेमका प्रेमाचा असतो कि स्वैराचाराचा ? 'व्हॅलेंटाईन वीक'च्या स्वागतासाठी भेटवस्तूंची दुकाने मागील तीन–चार दिवसांपासून सजली आहेत, वृत्तवाहिन्यांतून सौंदर्य तज्ज्ञांना निमंत्रित करून 'व्हॅलेंटाईन वीक'साठी मुलींनी कशा प्रकारे तयारी करावी याबाबतच्या 'टिप्स' दिल्या जात आहेत. 'कॉलेज कॅम्पस'मध्ये सुद्धा सध्या याच विषयाची चर्चा रंगलेली दिसून येते. इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे उलटली. मात्र त्यांच्या वैचारिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीच्या जोखडातून आपण अद्याप मुक्त झालो नसल्याचा प्रत्यय दर वर्षी 'व्हॅलेंटाईन वीक' सुरु झाला कि येऊ लागतो. 'व्हॅलेंटाईन डे'ची 'क्रेझ' जेव्हढी भारतात पाहायला मिळते तेव्हढी अन्य पाश्चिमात्य देशांमध्ये खचितच असावी. ७ फेब्रुवारीपासून १४ फेब्रुवारीपर्यंत विविध 'डेज' भारतासारख्या संस्कृतीप्रिय राष्ट्रात तरुण तरुणींकडून उत्साहाने साजरे केले जातात.शहरातील ही 'क्रेझ' हळूहळू ग्रामीण भागातही पसरू लागली आहे. मातृभाषेला डावलून इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये मुलांना घालण्याकडे पालकांचा वाढत चाललेला कल हेच यामागील प्रमुख कारण असावे. या दिवसांत अनेक शाळा आणि महाविद्यालयांच्या आवारात शैक्षणिक वातावरण बिघडवणाऱ्या घडामोडी घडत असतात. परीक्षेच्या तयारीच्या दिवसांत काही चंगळवादी युवक युवतींची भलतीच तयारी सुरु असते. ज्याचा परिणाम शाळा महाविद्यालयांतील अन्य विद्यार्थीवर्गावर होत असतो. अनेक ठिकाणी शाळा–महाविद्यालय प्रशासनही या गोष्टींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करते याचे खरेतर नवल वाटते. या दिवसांत 'डेज'च्या निमित्ताने पालकांच्या पैशांची तरुणांकडून मोठ्या प्रमाणात उधळपट्टी केली जाते. भारतीय संस्कृतीवर आघात करणारा आणि युवावर्गाचे नैतिक अध:पतन करणारा 'व्हॅलेंटाईन वीक' आपल्या देशात हवा तरी कशाला ?

**– सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

◆ पान १ वरून पुढे...

## रामेश्वर शिंगणे...

समजावुन सांगु तु आता जेवण करुन झोप. त्यानंतर रात्री ०९.३० वाजेच्या सुमारास रामेश्वर हा जेवन करुन मंदीराजवळ ओट्यावर बसलेला होता. त्यानंतर मी घरात काम करत होते. माझे घरातील काम आवरल्यावर मी बाहेर येवून बघितले असता मला रामेश्वर वट्यावर दिसला नाही. मी त्याला फोन केला असता त्यांचा फोन देखील बंद येत होता. त्यानंतर आम्ही रामेश्वर याचा सर्वत्र शोध घेतला नातेवाईकांना विचारपुस केली परंतु तो मिळुन न आल्याने आम्ही दि.०१/०२/२०२६ रोजी पोलीस ठाणे तलवाडा येथे मिसिंग दाखल केली होती. दिं. ३/२/२०२६ रोजी मंगळवारी सकाळी अंबिका नगर भागातील पिण्याच्या पाण्याच्या विहिरीत माझा मुलगा रामेश्वर शिंगणे ह्याचे शव तरंगतांना आढळून आल्याने त्यास आत्महत्यास प्रावृत केल्याप्रकरणी आई वंदना मोहन शिंगणे, यांच्या फिर्यादीवरून कलम बी. एन. एस. १०८.३५२.३५१.(२) (३) ५ प्रमाणे रात्री गुन्हा दाखल करण्यात आला गुन्हा दाखल होताच पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पाडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी अनिल कटके, यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मनोज निलंगेकर, यांनी तात्काळ पथक नेमले. पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल कोळी,सह कर्मचा–यांनी फिर्यादीतील नमुद आरोपीस अवघ्या चार तासात अटक केले. सपोनि मनोज निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक स्वपनिल कोळी हे करत आहेत.

## अजितदादा पवार...

यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या सुरुवात महिला व ज्येष्ठ शिक्षक श्री. कल्याणराव वाघमारे, प्रा. रामनाथ डाके व प्रा. कल्याणराव घोडके यांच्या हस्ते अजित दादांच्या प्रतिमेस हार अर्पण करून करण्यात आला. त्या नंतर विविध मान्यवरांनी अजितदादा पवार यांना श्रद्धांजली व्यक्त केली. यावेळी बोलताना प्रा. पाटील पुढे म्हणाले की, अजितदादा पवार हे विकास प्रिय नेते होते. महाराष्ट्रासह बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास त्यांच्या नेतृत्वाखाली सहज शक्य झाला असता; परंतु दादांचे अकाली निधन हे केवळ राज्यासाठीच नव्हे तर संपूर्ण देशासाठी मोठे नुकसानदायक ठरले आहे. त्यांच्या निधनाने सर्वच क्षेत्रांमध्ये मोठी पोकळी निर्माण झाली ही पोकळी कधीही भरून निघणार नाही. आज महाराष्ट्रातील प्रत्येक घराघरात आपल्याच घरातील व्यक्ती गेल्याची भावना असून सर्वत्र तीव्र हळहळ व्यक्त होत आहे. विकासाची स्पष्ट दृष्टी आणि निर्भीड निर्णयक्षमता आणि वेळेचे काटेकोर पालन हीच दादांची खरी ओळख होती. आपणही अजित दादा यांच्याप्रमाणे वेळेचे बंधन पाळले पाहिजे, वेळेचे बंधन पाळणे म्हणजेच अजित दादा पवार यांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली अर्पण करणे होय. या शोकसभेत उपस्थित अनेकजण भावना व्यक्त करताना अश्रूंना आवर घालू शकले नाहीत. यावेळी श्री. अमृत डावकर, प्रा. विजय पवार, प्रा. सत्येंद्र पाटील, प्राचार्य श्री. जालिंदर पैठणे, श्री. डाके बापू, प्रा. छायाताई सोंडगे, सौ. संगीता कदम, डॉ. नीता बावणे, प्रा. कावेरी कुरणे, प्रा. भानुदास कंठाळे, श्री. महेश सुपेकर, पथ संस्थेचे चेअरमन श्री. विजय खोसे, श्री. मोहन गोरे आदींनी आपल्या भावना व्यक्त केल्या. या प्रसंगी डॉ. शिवाजीराव सानप, डॉ. नारायण काकडे, ॲड. काकडे, प्राचार्य प्रा. राजेश मोराळे, प्रा. मंजुताई जाधव, प्रा. उमाकांत जगताप, प्राचार्य श्री. श्याम डाके, प्रा. श्रीराम चौभारे, प्रा. संजय काकडे, डॉ. परमेश्वर वाणी, मुख्याध्यापक श्री. सुभाष पवळ, डॉ. भांडवलकर, प्रा. तानाजी आगळे, प्रा. आर. आर. शिंदे, श्री. सर्जेराव सावंत, प्राचार्य श्री. तुपे, प्रा. पंजाबराव येडे, डॉ. वारे, प्रा. माने, प्रा. अमोल घुमरे, प्रा. आसाराम खुटाळे, श्री. गणेश कदम, औषध संघटनेचे श्री. देशमुख यांच्यासह बीड शहरातील अनेक प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ह.भ.प. श्री. संतोष डोंगरे महाराज यांनी केले.

## घरकुलधारकांनो...

जितेंद्र पापळकर हे वेळोवेळी विभागस्तरावर आढावा घेत मार्गदर्शन करत असून, बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्हास्तरावर संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवत सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. बीडचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांच्याशी सातत्याने संपर्क साधून वाळू उपलब्धता, प्रस्ताव व वितरण याबाबत समन्वय साधला आहे. बीड तालुक्यात घरकुल योजनेंतर्गत एकूण २५ हजार ३५३ लाभार्थी उद्दिष्ट असून त्यापैकी २३ हजार ३८६ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. पहिल्या टप्प्यात १९ हजार ८७५ लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळालेला असून सध्या सुमारे ७ हजार १०० घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या घरकुल बांधकामासाठी वाळू ही अत्यावश्यक बाब असल्याने मोफत वाळू वितरण योजना ग्रामीण भागासाठी अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. बीड तालुक्यात दहा वाळू घाट निश्चित – बीड तालुक्यासाठी दहा वाळू घाट निश्चित करण्यात आले असून सिंधफणा नदीपात्रातील विविध ठिकाणी हे घाट आहेत. रंजेगाव, रामगाव, बऱ्हाणपूर, आडगाव, कुक्कडगाव, खुंड्रस , साक्षाळ पिंपरी आदी ठिकाणी वाळू उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याशिवाय अंधापुरी, पिंपळादेवी, नागापूर बु., खांडे पारगाव , पारगाव सिरस या गावांमध्ये नव्याने नोंदणी केलेले प्लॉट असून येथून वाळू उपलब्ध करून देण्यात येत आहे .
खांडे पारगाव येथे प्रत्यक्ष वितरण – या पार्श्वभूमीवर बुधवार दिनांक ४ फेब्रुवारी रोजी बीड तालुक्यातील अथरवन पिंपरी जवळील टुकूर नदीपात्रात खांडे पारगाव येथील घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळूचे वितरण करण्यात आले. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली. या वेळी घरकुल लाभार्थी मधुकर तुकाराम सपकाळ व विकास बाबुराव आमटे यांना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या उपस्थितीत मोफत वाळू वाटप करण्यात आले. २५ पैकी १२ लाभार्थ्यांना वाळू वाटप पूर्ण – याबाबत माहिती देताना ग्राम महसूल अधिकारी अक्षय ढोपे यांनी सांगितले की, आतापर्यंत एकूण २५ घरकुल लाभार्थ्यांपैकी १२ लाभार्थ्यांना मोफत वाळूचे वितरण पूर्ण झाले असून उर्वरित लाभार्थ्यांनाही टप्प्याटप्प्याने वाळू दिली जाणार आहे . सध्या सुमारे ६०० ब्रास वाळूचे वितरण होणार असून, ज्या ठिकाणी वाळू उपलब्ध आहे तेथील प्रस्ताव तात्काळ दाखल करण्याच्या सूचना ग्राम महसूल अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत. लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांचा सहभाग – या वेळी खांडे पारगाव गावचे उपसरपंच अनील आबा आमटे , दत्ता सुरवसे, नवनाथ बापू सपकाळ, रवींद्र सपकाळ तसेच अथरवन पिंपरी येथील उपसरपंच अशोक शिंदे, प्रवीण शिंदे, अमोल शिंदे यांच्यासह घरकुल लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी मिळून प्रशासनास सहकार्य करत हा उपक्रम यशस्वी केला. यावेळी बोलताना तहसीलदार चंद्रकांत शेळके म्हणाले, बीड तालुक्यातील लहान नद्या, ओढे, नाले यामध्ये नैसर्गिकरित्या साठणारी वाळू शासन धोरणानुसार घरकुलधारकांना मोफत देण्यात येणार आहे. यामुळे अवैध वाळू उपसा थांबेल आणि गरजू नागरिकांना थेट लाभ मिळेल. घरकुलासाठी वाळू मिळवणे आमच्यासाठी मोठी अडचण होती. प्रशासनाने थेट नदीपात्रातून वाळू उपलब्ध करून दिल्यामुळे आमचा खर्च वाचला, अशी प्रतिक्रिया एका लाभार्थ्याने व्यक्त केली. गावकऱ्यांनी प्रशासन व तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे आभार मानले. ग्रामीण घरकुलांसाठी दिलासादायक उपक्रम – एकीकडे अवैध वाळू वाहतुकीवर कठोर कारवाई आणि दुसरीकडे शासन निर्णयानुसार पारदर्शक पद्धतीने मोफत वाळू वाटप – या दोन्ही बाबींचा समतोल राखत बीड जिल्ह्यात प्रशासन काम करत असल्याचे या उपक्रमातून स्पष्ट झाले आहे.घर बांधणं स्वप्न नाही , योग्य हात मिळाले तर सत्य होतं ग्रामीण भागातील घरकुलधारकांसाठी हा उपक्रम निश्चितच दिलासादायक ठरणार असून, पुढील काळातही शासन धोरणानुसार अशीच कार्यवाही सुरू राहणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## शिक्षणाच्या आयचा...

जिल्हाधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. मुख्याध्यापक राजेश देशमुख यांच्या वारंवारच्या गैरहजेरीमुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होत असून, संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. शिक्षणप्रेमी बाळासाहेब मोरे पाटील यांनी शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या अनागोंदी व निष्क्रियतेवर जोरदार टीका केली आहे. महिन्याला पाऊण लाख रुपये पगार घेणाऱ्या शिक्षकांकडून गोरगरिबांच्या लेकरांचे भविष्य उद्ध्वस्त केले जात आहे. अशा दांडीबहाद्दर शिक्षकांवर कठोर कारवाई करून शिस्त लावणे गरजेचे आहे, अशी मागणी त्यांनी केली. तक्रार प्राप्त झाल्यानंतर दि. ४ बुधवार रोजी विस्तार अधिकारी माटे एस.बी. आणि केंद्रप्रमुख सिद्दीकी एस.ए. यांनी भैरवनाथ वस्ती शाळेला भेट देऊन तपासणी केली. गेल्या आठवड्यात मुख्याध्यापकांच्या हजेरी मस्टरवर स्वाक्षऱ्या नसल्याचे आढळून आले. पालकांशी संवाद साधून संबंधित प्रकरणाचा सविस्तर अहवाल गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे सादर केला जाणार असल्याची माहिती विस्तार अधिकारी माटे यांनी दिली.
ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे भवितव्य धोक्यात येऊ नये, यासाठी संबंधित शिक्षकांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

## राजमाता जिजाऊ...

ढेपे यांबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट्स व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राज्याचे कौशल्यविकास...

सांत्वनासाठी आले होते. सांत्वन भेट झाल्यानंतर त्यांनी सिरसाळा येथील ग्लोबल विकास ट्रस्टच्या कृषीकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्रास भेट दिली. यावेळी विविध जिल्ह्यांतून प्रशिक्षण घेण्यासाठी आलेल्या शेतकऱ्यांशी त्यांनी संवाद साधला. ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांच्याशी मराठवाड्यातील शेती आणि शेतकऱ्यांच्या भविष्यातील व्यावसायिक संधी याबद्दल विस्तृत चर्चा झाली. शेतकऱ्यांसाठी आवश्यक असलेले तांत्रिक प्रशिक्षण ग्लोबल विकास ट्रस्टकडून दिले जात आहे. ऋतढ चे काम शेतकऱ्यांचे जीवन उंचावण्याच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरेल असे विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## रेड रिबीन...

समुपदेशक श्री. प्रेमानंद स्वामी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थ्यांनी नागरिकांना समुपदेशन केले. याउपक्रमामध्ये सहभागी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे तसेच उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## परमेश्वर सोळंके...

जपणारी आणि सकारात्मक पत्रकारिता करणाऱ्या पत्रकार व संपादकांचा सन्मान करणे ही अत्यंत अभिनंदनीय बाब आहे. अशा सन्मानामुळे पत्रकारांचे मनोबल वाढते व समाजहिताचे कार्य करण्यास अधिक प्रेरणा मिळते. दरम्यान, परमेश्वर सोळंके यांच्या सन्मान सोहळ्यास माजलगाव तालुक्यातील त्यांचे सहकारी बाळासाहेब आडागळे, शेख हमीद, अमर साळवे, संतोष रासवे, बाळासाहेब उपाडे, पृथ्वीराज निर्मळ, संतोषकुमार जेथलिया तसेच मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## मुख्यमंत्री फडणवीस...

विविध प्रकारची आंतरपीके घेऊ शकतात.
AI अर्थात कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर– या कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांना अनुदान तत्वावर दर्जेदार कलमी रोपे, देशी झाडांची रोपे, ठिबक सिंचन संच, माती परीक्षण, सेंद्रिय खते तसेच फळबाग लागवडीसाठी आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन पुरविले जाते. या संपूर्ण कार्यक्रमाची अंमलबजावणी 'फार्मर्स फॉर फॉरेस्ट' संस्था करत आहे. लागवडीनंतरही शेतकऱ्यांना सातत्यपूर्ण तांत्रिक सहाय्य देण्यासाठी विशेष यंत्रणा या संस्थेने उभारली आहे. दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षातही शेतकऱ्यांना खतांचा पुरवठा करण्यात येणार आहे. तसेच लागवड झालेल्या झाडांची देखरेख व वाढ नोंद करण्यासाठी ड्रोनद्वारे छायाचित्रे, उपग्रह डेटा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता चा वापर करून डिजिटल निरीक्षण प्रणाली राबवली जाणार आहे. माती परीक्षण तसेच फळबाग लागवडीच्या विविध टप्प्यांवर घ्यावयाच्या आवश्यक काळजीविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी वेगवेगळ्या वेळेला डिजिटल कार्यशाळा आयोजित केल्या जातील. यासोबतच विविध माध्यमांचा वापर करून सातत्यपूर्ण तांत्रिक मार्गदर्शन आणि माहिती पुरवली जाणार आहे. फळबागेसह कार्बन क्रेडिट द्वारे उत्पन्नाचा लाभ– यासोबतच हा उपक्रम मातीची सुपीकता वाढविणे, कार्बन शोषण वाढविणे आणि स्थानिक जैवविविधतेचे संरक्षण करणे यासाठीही उपयुक्त ठरणार आहे. सदरील फळबागा भविष्यात कार्बन क्रेडिट मार्केटशी संलग्न करण्यात येणार असून, फळ उत्पादनातून मिळणाऱ्या उत्पन्नासोबतच कार्बन क्रेडिटच्या माध्यमातूनही अतिरिक्त उत्पन्नाचा पर्यायी स्रोत उपलब्ध होईल. तसेच ग्रामीण भागात हरित रोजगाराच्या संधी निर्माण होतील. हा उपक्रम पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत शेती विकासासाठी एक आदर्श मॉडेल ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## बीड शहरात....

आजही स्व.अजितदादा पवार हे आपल्यात नाहीत हे मन मानायला तयार नाही. स्पष्टोक्तेपणा, धाडसी निर्णय आणि कामावरचा विश्वास ही दादांची खरी ओळख होती. संकाटातही न डगमगता राज्याच्या विकासासाठी झटणारा नेता म्हणून अजितदादा कायम स्मरणात राहतील. स्व.दादांच्या नेतृत्वाखाली बीड शहरातील जनतेने नगर पालिका निवडणुकीत भरभरून आशिर्वाद दिले. बारामतीसारखा बीड शहराचा विकास करण्याचा संकल्प आदरणीय दादांनी केला होता, असे दादा बीडकरांच्या कायम स्मरणात राहावेत यासाठी शहरात स्व.अजितदादा पवार यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्याचा संकल्प आम्ही केला असेही ते यावेळी म्हणाले. दुपारी २ वाजेपर्यंत राष्ट्रवादी कार्यालयात स्व.दादांचा अस्थीकलश दर्शनासाठी ठेवण्यात आला होता. त्यानंतर आ. विजयसिंह पंडित अस्थीकलश घेऊन श्री क्षेत्र राक्षसभुवन (शनिचे) येथे रवाना झाले. यावेळी उपस्थितांनी अजितदादा अमर रहे, एकच वादा अजितदादा अशा घोषणा दिल्या. याप्रसंगी भावनिक वातावरण बनले होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस माजी आमदार अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित, आ. धनंजय मुंडे, आ. प्रकाश सोळंके, माजी आमदार बाळासाहेब आजबे, भिमराव धोंडे, संजय दौंड, रमेश आडसकर, बाजीराव धर्माधिकारी, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, नगराध्यक्षा श्रीमती प्रेमलता पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, राष्ट्रवादी ओबीसी सेलचे कल्याण आखाडे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, सभापती शेख निजाम, दिलीप गोरे, अमर नाईकवाडे, संपादक शेख मुजीब, शेख तय्यब, बळीराम गवते, जैतुल्ला खान, जकी सौदागर, बाळासाहेब गुंजाळ, संजय उडान, अशोक हिंगे, प्रज्ञाताई खोसरे, ॲड.राजेंद्र राऊत, सुनिल पाटील, राजाभाऊ औताडे, अयुब पठाण, वैजिनाथ साळुंके, कल्याण आबुज, भागवत तावरे, भाऊसाहेब नाटकर, जगन्नाथ काळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच बीड शहरातील अजितदादाप्रेमी नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री सोमेश्वर महादेव...

बाळ नलधर, श्रीराम मुळे सर. थी. बंडुभाऊ कदम एकनाथराव गायकवाड सर, आत्माराम शिराळे, वसंतराव कत्म, विनोद अनिल परंडकर, अनिलनाना पांडे, दिपक वामु कदम, नागोराव काकडे. बप्पासाहेष पुगे, सॉ. सता दत्ता मोरे व सर्व भक्तगण. सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाऊंडेशन, बीड. स्थळ :– सोमेश्वर मंदिर श्री. सोमेश्वर नगर, बार्शी रोड, बीड

## बीड शहरासाठी....

शहरालगत घुमरे वस्ती व धानोरा रोड मार्गे नवीन पाणीपुरवठा योजना उभारणे आवश्यक असल्याचे शिष्टमंडळाने निदर्शनास आणून दिले. तसेच, नव्याने विकसित झालेल्या वस्त्यांसाठी स्वतंत्र पाण्याच्या टाक्या व वितरण व्यवस्था उभारण्यात यावी. सध्या शहरातील अनेक भागात ८ ते १५ दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शहरात पाण्याची उपलब्धता असूनही योग्य नियोजनाच्या अभावामुळे पुरवठा विस्कळीत होत असल्याचे सांगत सर्व भागांना नियमित व समान पाणीपुरवठा करण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शिष्टमंडळाने केली. यासोबतच अमृत अटल पाणीपुरवठा योजना १.० अंतर्गत उर्वरित कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व संबंधित कंत्राटदारांकडून तातडीने पूर्ण करून सर्व झोनमधील वितरण व्यवस्था सुरळीत करण्यासाठी निर्देश देण्यात यावेत. तसेच, महावितरण कंपनीची बीड नगरपरिषदेकडे असलेली थकबाकी हा जटील प्रश्न सोडवून पाणीपुरवठा योजनांमध्ये अडथळे निर्माण होऊ नयेत, यासाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी मागणी डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केली आहे. यावेळी मुख्याधिकारी शैलेश फडसे, माजी नगरसेवक गणेश वाघमारे, रवी कदम, नगरसेवक सय्यद मुस्तफा, नगरसेविका मीना जाधव, समीक्षा शेटे, सावित्री साखरे, भाग्यश्री तांबारे भाग्यश्री देशपांडे, ॲड.नागेश तांबारे, विकास जोगदंड, संपादक साहस आंदोडे, ॲड.गोविंद शिराळे, बाळासाहेब गुजर, सागर देशपांडे, मंगेश धोंगडे, सनी माने, राकेश जाधव, नितीन साखरे, माणिक वाघमारे, विशाल राऊत यांच्यासह भाजपचे आजी–माजी नगरसेवक, पदाधिकारी उपस्थित होते.

## मुंबई-पुणे एक्स्प्रेस....

आपत्ती प्रतिसाद दलाची कुमक मागवली. त्यांनीही प्रयत्न केले. मात्र हे काम खूप आव्हानात्मक होते. जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. त्यामुळे भारत पेट्रोलियम हिंदुस्तान पेट्रोलियम आणि रिलायन्स कंपनीच्या तज्ञांना बोलवण्यात आलं. या पथकांनी गॅस गळतीवर नियंत्रण मिळवलं, अशी माहिती एकनाथ शिंदेंनी दिली. दरम्यान प्रवाशांना एमएसआरडीसीकडून मोठ्या प्रमाणावर पिण्याचे पाणी, बिस्किट्स देण्यात आले. सर्व अधिकारी कर्मचारी रस्त्यावर होते. एवढेच नाही तर पथकर वसुली करू नये म्हणून देखील निर्देश मी दिले असल्याचे उपमुख्यमंत्री म्हणाले. वाहतूक व्यवस्था पूर्वपदावर येईपर्यंत या महामार्गावरील टोल वसूली थांबविण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. मुंबई पुणे मिसिंग लिंकचे काम अंतिम टप्प्यात असून ते तातडीने पूर्ण करून हा टप्पा लवकरात लवकर सुरू करण्याचे निर्दे शही त्यांनी विभागाला दिले. ही लिंक सुरू झाल्यानंतर मुंबई पुणे प्रवासातील अंतरही वाचेल त्याचप्रमाणे अशा घटना घडल्यास पर्यायी वाहतुकीचा मार्गही कामाला येईल असे सांगून त्यांनी एमएसआरडीसी त्याचप्रमाणे पोलीस अधिकाऱ्यांशी विस्तृत चर्चाही केली आणि एक आपत्कालीन आराखडा तयार करण्यास सांगितले. मुंबई–पुणे एक्सप्रेसवे वाहतूक बदल करण्यात आला आहे. एक्सप्रेस–वे आणि जुना हायवे दोन्ही ठप्प आहेत. त्यामुळे प्रवाशांनी खालील पर्यायी मार्गांचा वापर करावा असं आवाहन करण्यात आलं आहे. १) ताम्हिणी घाट मार्ग: पुणे फपौड फताम्हिणी घाट फमाणगाव फमुंबई. (दक्षिण मुंबईसाठी उपयुक्त) २) माळशेज घाट मार्ग: पुणे फचाकण फनारायणगाव फमाळशेज घाट फकल्याण/ठाणे. (उपनगरांसाठी उपयुक्त) लोणावळा–खंडाळा मार्ग पूर्णपणे टाळावा. प्रवासाचा वेळ ३–५ तासांनी वाढू शकतो, त्यामुळे पुरेसे इंधन आणि पाणी सोबत ठेवावे. असे आवाहन महामार्ग पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## बीड जिल्हयामध्ये...

व्यतीरिक्त इतर कर्मचारी तसेच व्यक्तीना प्रवेश देऊ नये, इतर कर्मचारी परीक्षा केंद्रावर आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, परीक्षा केंद्रावर अनुदानित, अंशतः अनुदानित व जिल्हा परिषदेचे शिक्षक व इतर कर्मचारी नेमावेत, परीक्षा केंद्रावरील सर्व कर्मचाऱ्यांसाठी ओळखपत्र अनिवार्य करण्यात यावे, तालुकास्तरावरुन महत्वाच्या पेपरला वर्ग १ च्या अधिकाऱ्यांनी परीक्षा केंद्रांना भेटी द्याव्यात.बीड जिल्हयामध्ये कॉपीमुक्त अभियान राबवून जिल्हा कॉपीमुक्त होण्याच्या दृष्टीने संबधित यंत्रणेने प्रयत्न करावेत, तसेच संवेदनशील परीक्षा केंद्रावर जास्तीत जास्त लक्ष ठेवून परिक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी संबधित अधिकारी. कर्मचा–यानी लक्ष द्यावे असेही श्री. जॉन्सन या प्रसंगी म्हणाले. या VC बैठकीस संबधित अधिकारी उपस्थित होते.–बीड जिल्हयामध्ये मंडळातर्फे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) फेब्रुवारी मार्च–२०२६ आयोजित केल्या आहेत. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा दि.१०फेब्रुवारी ते दि.१८ मार्च २०२६ आणि माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा दि.२० फेब्रुवारी ते दि.१८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आल्या आहेत. फेब्रुवारी/मार्च–२०२६ चे सुयोग्य प्रकारे संचालन व्हावे, परीक्षा केंद्रावर गैरप्रकार होऊ नये यासाठी महाराष्ट्र शासन मुख्य सचिव यांनी दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी दूरचित्र प्रणालीव्दारे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधीक्षक तसेच परीक्षेशी संबंधित अधिका–यांची बैठक घेवून सूचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये जिल्हा स्तरावर दक्षता समितीची बैठकः आयोजीत करून प्रत्येक परीक्षा केंद्रावर उउढत कैमेरे बर्सावणे, संवेदनशील परीक्षा केंद्रावरील केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व इतर कर्मचारी यांची अदलाबदल करणे, बैठे पथक व भरारी पथक नियुक्त करणे याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. जिल्हा स्तरावर दक्षता समिती गठीत करण्यात आलेली आहे.–जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन अध्यक्ष, पोलीस अधिक्षक नवीनीत कॉवत सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी, जितिन रहेमान सदस्य, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण सदस्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य सदस्य, प्राथमिक शिक्षणाधिकारी सदस्य योजना शिक्षणाधिकारी सदस्य, माध्यमिक शिक्षणाधिकारी सदस्य सचिव आहेत. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी दि.२७ जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. सर्व गटविकास अधिकारी यांनी जिल्ह्यातील सर्व ग्रामस्तरावर कॉपीमुक्त अभियानाची जनजागृती करावी तसेच गटशिक्षणाधिकारी यांनी सर्व शाळामध्ये मुख्याध्यापक व पालक यांना परीक्षेसंबंधित कॉपीमुक्त अभियानाची माहिती दयावी. आकाशवाणी व इतर प्रसार माध्यमांमध्ये कॉपीमुक्त अभियानाची प्रसिध्दी देण्यात यावी भरारी पथकांनी इंग्रजी, गणित व विज्ञान इत्यादी महत्वाच्या विषयांच्या पेपरच्या दिवशी संवेदनशील केंद्रांना भेटी द्याव्यात. परीक्षेचे चित्रीकरण ड्रोन कॅमेऱ्याद्वारे करावे. पोलीस विभागा मार्फत सर्व परिरक्षक कार्यालय व परीक्षा केंद्रावर पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन देण्यात यावा अशा सूचना त्यांनी दिलेल्या होत्या. परीक्षा केंद्रापासून ५०० मीटर परिसरात झेरॉक्स सेंटर परीक्षा कालावधीत बंद ठेवण्यात येणार आहे, तसेच संबंधित परीक्षा केंद्राच्या परीसरात प्रतिबंधात्मक उपायोजना लागू करण्यात येणार असून परीक्षा केंद्रावर गैर प्रकार घडल्यास गैरप्रकारांना प्रोत्साहीत करणारे, मदत करणारे व प्रत्यक्ष गैरमार्गाचा अवलंब करणाऱ्यांवर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे. जिल्हा दक्षता समितीने इ.१० व १२ वी च्या परीक्षा शांततेत व तणावमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी व विद्यार्थ्यामध्ये गुणवत्ता वाढ होण्याच्या दृष्टीने जिल्हाभर कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्याबाबतच्या उपाययोजना केलेल्या असून मुलांच्या शिक्षणाचा पाया मजबूत होण्यासाठी कॉपीमुक्त अभियान महत्वाची भूमिका असल्याचे जिल्हाधिकारी म्हणाले.

## २०२१ ला बीडचा....

दै. प्रारंभचे संपादक जालिंदर धांडे, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर, महिला आघाडी संपर्क प्रमुख संगीता चव्हाण, शिवसेना, युवासेना महिला आघाडी, ओबीसी व्हिजिएनटी सेना, एस.टी. कामगार सेनेचे आजी–माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटन सोहळ्याचे प्रास्ताविक चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी केले. त्यांनी महोत्सवाच्या संकल्पनेपासून ते आयोजनापर्यंतची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली.
शिवसेनेच्या उपनेत्या संगीता ठोंबरे यांनी अनिलदादा जगताप यांच्या कार्याचे कौतुक करत चंपावती महोत्सव हा बीडच्या सांस्कृतिक क्षेत्रातील मैलाचा दगड ठरत असल्याचे सांगितले. संपादक संतोष मानूरकर यांनी चंपावती महोत्सव चिरायू होवो अशा शुभेच्छा दिल्या, तर संपादक गंमत भंडारी यांनी कलाकारांसाठी अनिलदादा जगताप करत असलेल्या कार्याचे विशेष कौतुक केले. शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप म्हणाले की, महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते सन्माननीय एकनाथ शिंदे साहेब आणि संसद रत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त बीडच्या कलाक्षेत्राला समृद्ध करण्याच्या उद्देशाने चंपावती महोत्सवाची सुरुवात करण्यात आली आहे. कलेचा वारसा चंपावती महोत्सवाच्या माध्यमातून अखंडितपणे पुढे नेण्याचे आम्ही सर्व कलाकारांना आश्वासन देतो, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी उद्घाटन सोहळ्यास उपस्थित सर्व मान्यवरांचे व कलाकारांचे अनिलदादा जगताप यांनी आभार मानले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# विद्यार्थ्यांचे सामुहिक नृत्य, नाट्य, गायन कलाविष्काराने प्रक्षेक झाले मंत्रमुग्ध...

## केजच्या विक्रमराव मुंडे पोदार लर्न स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात












**केज । प्रतिनिधी**

रेणूकामाता कृषी विकास प्रतिष्ठान देवगाव संचलित केज येथिल विक्रमराव मुंडे पोदार लर्न स्कूलमध्ये २०२५-२६ चे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.स्नेहसंमेलनात Virasat -e-Cinema मधून भारतीय चित्रपटसृष्टीचा जिवंत इतिहास साकारण्यात आला तसेच भारतीय चित्रपटसृष्टीच्या ब्लॅक अँड व्हाईट जनसामान्यांपासून ते आजच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त युगापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास विद्यार्थ्यांनी प्रभाविणे उलगडला.यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेले सामूहिक नृत्य, नाट्य, गायन कलाविष्काराने प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले होते.

रेणूकामात कृषी विकास प्रतिष्ठान देवगाव संचलित केज येथिल विक्रमराव मुंडे पोदार लर्न स्कूलमध्ये सोमवारी सायंकाळी ६ वाजता वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. स्नेहसंमेलानाचा शुभारंभ संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विक्रम बप्पा मुंडे व सौ.कृष्णाबाई मुंडे यांच्या शुभहस्ते तर केजच्या नगराध्यक्षा सौ.सितातार्इ बनसोड, केज नगरपंचायतीचे गटनेते हारूनभाई इनामदार, केज पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक स्वप्निल उनवणे, केजचे गटशिक्षणाधिकारी सुनिल केंद्रे, पोद्दार शाळेचे लोकेशकुमार शाहा, डॉ.प्रियंका मुंडे, डॉ.शितल कुंकुळोळ, साळेगाव केंद्राचे केंद्रप्रमुख अर्जुन बोराडे, संस्थेचे उपाध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य विजयकांत मुंडे, संस्थेचे सचिव अतुल मुंडे, प्रा.माधूरीताई मुंडे, सरपंच रूपाली ताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.यावेळी विद्यार्थ्यांनी "Virasat-e-Cinema' मधून भारतीय चित्रपटसृष्टीच्या अभिनव संकल्पनेवर जिवंत इतिहास उत्साहात आणि दिमाखात साकारला.तसेच भारतीय चित्रपटसृष्टीच्या ब्लॅक अँड व्हाईट जमान्यापासून ते आजच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त युगापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास या कार्यक्रमातून प्रभावीपणे उलगडण्यात आला. सिने ईतिहासाच्या विविध टप्प्यांना नाट्य, नृत्य आणि अभिनयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी जिवंत रूप देत उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली.कार्यक्रमात मूकपटांच्या साधेपणापासून ते रंगीत चित्रपटांच्या सुवर्णकाळापर्यंत, तसेच आधुनिक चित्रपटांतील तंत्रज्ञान, संगीत आणि कथानकातील बदल यांचे सादरीकरण अत्यंत कल्पकतेने करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण अभिनयाने, भावपूर्ण नृत्याविष्काराने आणि नेमक्या अभिव्यक्तीने भारतीय चित्रपटसृष्टीचा सांस्कृतिक वारसा प्रेक्षकांसमोर साकार झाला. प्रत्येक सादरीकरणात शिस्त, मेहनत आणि सर्जनशीलतेचा सुंदर संगम दिसून आला. या स्नेहसंमेलनाने केवळ मनोरंजनच केले नाही,तर भारतीय सिनेमाच्या समृद्ध परंपरेची ओळख नव्या पिढीला करून दिली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ देत त्यांच्यातील आत्मविश्वास वृद्धिंगत करणारा हा कार्यक्रम उपस्थितांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरला आहे. प्रसंगी नगरसेवक ओमप्रकाश रांजवणकर, बालासाहेब बोराडे, सुरज घुले, राधाकिसन मुंडे, उद्योजक विजयकुमार भन्साळी, मधुर मुंडे, समिर देशपांडे, माजी सरपंच विठ्ठल मुंडे, सरपंच आरुण चाटे,सरपंच सचिन गायकवाड,डी. एल नागरगोजे,भारत ज्वेलर्सचे भारत बदगुडे यांची उपस्थिती होती.दरम्यान स्नेहसंमेलनाचा संपूर्ण कार्यक्रम राधा बन्साळी मॅडम, अदिती पाटील मॅडम, गणेश काळे सर, शरद चवरे सर, अनिकेत पाटील सर, अंकुरवाड मॅडम,धनंजय मस्के सर, अमर शिंदे सर, अविनाश शीलवंत सर,ओम ठोंबरे सर, नवीन कुमार सर, सोमनाथ इंगळे सर, रवी त्रिभुवन सर, शुभांगी सगरे मॅडम, शीतल काळे मॅडम, सुमया आतार मॅडम, झीनत शेख, शीला घोळवे मॅडम, तेजश्री सगरे मॅडम,दिपाली राजमाने मॅडम, लीना त्रिभुवन मॅडम, बैजू प्रकाशक अश्विनी मगर मॅडम, अंजुम शेख मॅडम, प्रणिता वाघमारे मॅडम, वैष्णवी वडगावकर मॅडम, आश्विनी सुरवसे मॅडम, सविता ओव्हाळ मॅडम, मेघा मोरे मॅडम, पल्लवी कुलकर्णी मॅडम,तसेच सर्व चालक व मावशी यांचा मोलाचा सहभाग होता. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शाळेच्या व्यवस्थापनाचे, शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## नादब्रह्म संगीत विद्यालयाचा आयुष थिगळे तबला विशारद पुर्ण परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

**बीड । प्रतिनिधी**

येथील नादब्रह्म संगीत विद्यालयाचा विद्यार्थी आयुष रविंद्र थिगळे अ.भा.गां.मंडळ, मुंबई या संस्थेद्वारे घेण्यात आलेल्या डिसेंबर -२०२५ सत्रातील तबला विषयाच्या विशारद पुर्ण परीक्षेत ५२० गुणांसह प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाला आहे.बालपणापासुनच आयुषला तबला वादनाची आवड होती.त्याचे विशारद पुर्ण पर्यंतचे तबला वादनाचे शिक्षण नादब्रह्म संगीत विद्यालयात गुरुवर्य प्रा.महेश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली झाले.तबला वादनासोबतच आयुष थिगळे सध्या पुणे येथे नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयात



द्वितीय वर्षाचे शिक्षण घेत आहे. उच्य शिक्षण आणि कला या दोन्हींचा त्याने उत्तम समन्वय साधला आहे.त्याच्या या यशाबद्दल सांगितिक क्षेत्रातील मान्यवर , संगीत साधक तसेच परिवारातील सदस्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## त्यागमुर्ती माता रमाबाई आंबेडकर यांच्या जयंती महोत्सवा निमित्त दि.७ फेब्रुवारी रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

त्यागमुर्ती माता रमाबाई आंबेडकर यांच्या जयंती महोत्सवाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे अयोजन महाविहार धम्मभूमी डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन नगर शिवणी ता. जि.बीड या ठिकाणी करण्यात आले आहे. बीड शहर व परिसरातील धम्मप्रेमी सर्व बौद्ध उपासक उपासिका यांनी हजारोंच्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था, बीडच्यावतीने मुख्य संयोजक पु.भिक्खु धम्मशील थेरो यांनी केले आहे. शनिवार दि.०७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा मिरवणूक होईल. ९:३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला व रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात येणार येणार आहे. तर दुपारी १२ वाजता महाविहार धम्मभूमी डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन नगर शिवणी ता.जि.बीड. त्यागमुर्ती माता रमाबाई आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात येणार आहे. यावेळी हिंगोली येथील पु.भिक्खु पय्यावर्धन आणि नांदेड येथील पु.भिक्खुणी चारुशीला यांच्या प्रमुख धम्मदेसनेने कार्यक्रमास सुरुवात होणार आहे. यावेळी बीड जि.प.चे समाज कल्याण अधिकारी श्रावस्ती मेश्राम यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लाभणार आहे. दुपारी १२



वा. शिवणी येथे भोजनदान, १२:३० वा. मुख्य कार्यक्रमाचे उदघाटन १ वा पाहुण्यांचे स्वागत मार्गदर्शन व धम्मदेशना, दुपारी २ वा. कु. खुशबु मिसळे (नेर) जि. यवतमाळ यांचे 'एका वादळाची संगिनी मी रमाई' हे एकपात्री नाटक होणार आहे., दुपारी ३ वा. त्यागमूर्ती माता रमाई पुरस्काराचे वितरण होईल. व त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम होईल. ज्यांना ज्यांना सहभाग नोंदवायचा आहे त्यांनी अलकाताई डोंगरे- ९०२१७८६३३१, वंदनाताई वाघमारे- ९२८४९७६८१९, पंचशीलाआई सरपते - ९५१८७११९३६, ऋतुजा डोळस- ९३७०११५८६१, शितलताई पालके -७२४८९६६२२७ यांच्याशी नांव नोंदणी दान जमा करण्यासाठी संपर्क साधावा. वरील सर्व कार्यक्रमास बीड शहर व परिसरातील धम्मप्रेमी सर्व बौद्ध उपासक उपासिका यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मुख्य संयोजक पु. भिक्खु धम्मशील थेरो आणि प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था, बीड व त्यागमूर्ती माता रमाबाई आंबेडकर जयंती

## नववे बौद्ध साहित्य संमेलन नागपूर येथे ; स्वागताध्यक्षपदी जितेंद्र वासनिक यांची निवड

**अंबाजोगाइन । प्रतिनिधी**

बौद्ध साहित्य परिषदेच्या केंद्रीय कार्यकारिणीची बैठक नुकतीच नागपूर येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी बौद्ध साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे हे होते. बैठकीत आगामी नववे बौद्ध साहित्य संमेलन नागपूर येथे आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी जितेंद्र वासनिक यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. आतापर्यंत महाराष्ट्रातील विविध ठिकाणी बौद्ध (पाली) साहित्य संमेलनांचे यशस्वी आयोजन करण्यात आले आहे. यापूर्वीच्या सर्व संमेलनांच्या माध्यमातून। पाली भाषा, साहित्य व संस्कृती यावर सखोल विचारविनिमय व चर्चा होत असून, त्यातून फुले-शाहू-आंबेडकर चळवळ अधिक बळकट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यापूर्वी या संमेलनाचे अध्यक्षपद ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ.ह.साळुंखे, डॉ. यशवंत मनोहर, ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे, डॉ. प्रदीप आगलावे, कथाकार योगीराज वाघमारे, प्रा. दत्ता भगत, पद्मश्री लक्ष्मण माने आणि डॉ. नरेंद्र जाधव यांनी भूषवले आहे. गतवर्षी पुणे येथे संविधान केंद्रस्थानी ठेवून या साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. अलीकडेच केंद्र शासनाकडून पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर, यंदाच्या संमेलनात पाली भाषेच्या विकास आणि अनुवादा संदर्भात

## प्रा. डॉ. शाहीन सय्यद यांना नारीरत्न पुरस्कार



**चौसाळा । प्रतिनिधी**

कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथील गृहशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. शाहीन सय्यद यांना व्यंकटेश बहुउद्देशीय सेवा भावी संस्था पुणे यांच्या तर्फे राज्यस्तरीय आदर्श नारीरत्न पुरस्कार नुकताच देण्यात आला. त्यानिमित्त महाविध्यालयात प्राचार्य डॉ. पंडित खाकरे यांच्या शुभ हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी बोलताना प्राचार्य डॉ. खाकरे म्हणाले की,या पुरस्कारामुळे महाविध्यालायाचा नावलौकिक निश्चितच वाढेल असेच कार्य सर्व प्राध्यापकांनी केले. तर भविष्यात सर्वांनाच असे पुरस्कार मिळतील. या वेळी पदव्युत्तर संचालक प्रा. डॉ. सुधाकर वनवे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी कालिकादेवी महाविद्यालय शिरूर येथे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत यश मिळविल्याबद्दल कु. सीता क्षीरसागर, कु. मोहिनी गवळी व संघप्रमुख प्रा. सुधीर माने यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात प्रा. डॉ. शाहीन सय्यद यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. पंढरीनाथ हिरवे यांनी केले. तर आभार प्रा. सुधीर माने यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



*मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड अंतर्गत गाव मंकुरवाडी ता. जि.बीड येथे जागतिक कर्करोग निवारण दिन निमित्त व्यसनमुक्ती अभियान राबविण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव तेजस पवार यांनी व्यसन केल्याने विविध प्रकारचे कॅन्सर होण्याची शक्यता असते हे सर्वांना पटवून दिले. व व्यसन करू नये असा सल्ला दिला.यावेळी उपस्थित संस्थेचे सचिव तेजस पवार, तेजस्विनी पवार,रोहन डोळस, सदस्य व गावकरी होते.*

## सौ. के.एस.के महाविद्यालय बीड येथे रोल ऑफ सायबर सेक्युरेटी इन डेली लाईफ या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

येथील सौ. के.एस.के. महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभागाच्या वतीने प्रा. संजय काळे यांचे रोल ऑफ सायबर सेक्युरेटी इन डेली लाईफ याविषयावर विशेष व्याख्यान दि. २७ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना म्हणाले की, सध्याच्या काळात सायबर सेक्युरेटी ही अत्यंत आवश्यक असून त्यावर उपाय योजना कराव्यात. याबद्दल त्यांनी महाकवच ॲपची सखोल अशी माहिती विद्यार्थ्यांना दिली. अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे म्हणाल्या की,



संगणक विभागा मार्फत प्रत्येकवर्षी विविध विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते असते. यावेळी त्यांनी रोल ऑफ सायबर सेक्युरेटी इन डेली लाईफ हा महत्वाचा विषय असून सायबर गुन्हेगारी विषयी जागृता आणि सुरक्षीत डिजीटल सवयी याबद्दल विद्यार्थ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळानकर, कमवि उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संगणक विभागप्रमुख श्रीमती प्रा. सोनाली गवारे यांनी केले तर आभार प्रा. ऐश्वर्या रुईकर यांनी मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विद्यार्थी राहुल बनगे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकत्तर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.

# मराठीभाषेत ज्ञानसाधनांची निर्मिती आवश्यक: जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

विविध ज्ञान शाखांचे उच्चशिक्षण आपण इंग्रजी भाषेतून घेत असतो. या ज्ञानांची साधने ही आपल्या म्हणजेच मराठी भाषेतून असावीत. त्यासाठी सर्व विद्याशाखांचे ज्ञान हे मराठी भाषेत आणून विश्वकोश सारख्या मराठी ज्ञानसाधनांची निर्मिती आवश्यक आहे,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयात आज महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळातर्फे 'वनस्पतीविज्ञान आणि भौतिकविज्ञान' नोंदलेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.



पंकजा वाघमारे अध्यक्षस्थानी होत्या. होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राचे निवृत्त शास्त्रज्ञ विजय लाळे, शासकीय विज्ञान संस्थेचे संचालक डॉ. राजेंद्र सातपुते, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. अशोक चव्हाण, प्रा. अरविंद धाबे, महाविद्यालयाचे माजीप्राचार्य डॉ. नवल थोरात, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी.बी. राजेशेख, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुलोचना राठोड, विश्वकोश मंडळाचे विद्याव्यासंगी सहायक रविंद्र घोडराज, डॉ. स्नेहा खोब्रागडे आदी मान्यवर उपस्थित होते.

दीपप्रजवलनाने कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, मराठी विश्वकोश म्हणजे ज्ञानप्राप्तीचे विश्वासार्ह साधन होय. प्रत्येक संकल्पना विश्वकोशात अधिकृत मांडलेली असते. अलिकडच्या इंटरनेट युगात माहितीचे अनेक स्रोत आहेत. पण ह्या स्रोतातून मिळणारी माहिती अधिकृत असली पाहिजे. त्यासाठी ज्ञानालाआधार असावा लागतो. याशिवाय तयार केलेले ज्ञान हे सातत्याने अद्यावत केले गेले पाहिजे. नवनवीन संकल्पना, शोध, संशोधन यांचा त्यात समावेश करुन ज्ञान अद्यावतीकरण करणे आवश्यक आहे.बुद्धिला चालना देण्याचे कार्य ज्ञान करीत असते. अशी ही ज्ञानाचे साधने मराठी भाषेतून निर्माण होणे आवश्यक आहे,असेही त्यांनी यावेळी सांगितले. अध्यक्षीय समोप प्राचार्य डॉ. पंकजा वाघमारे यांनी केला. सूत्रसंचालन रुपेश मडकर यांनी तर डॉ. सुहासिनी गेडेकर यांनी आभार मानले.

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

दैनिक

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● गुरूवार, दि. ०५ फेब्रुवारी २०२६ ●

## रामेश्वर शिंगणे यास आत्महत्यस प्रावृत केल्याप्रकरणी तलवाडा पोलीसात गुन्हा दाखल



तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा(अंबिकानगर) येथील रहिवाशी आसलेल्या वंदना मोहन शिंगने यांनी तलवाडा पोलीस स्टेशनला माहिती देतांना सांगितले की मला रामेश्वर (गोरख) शिंगणे वय वर्षे २५ व दोन मुली यशोदा आणि रंजना असे तीन अपत्य असुन दोन्ही मुलींचे लग्न झालेले आहे. आमची आसनारी शेती गट नं.१५६२ या शेतातील जागेवरुन मागील २०-२५ वर्षापासुन भावकितील लक्ष्मण शिंगणे व मनिषा शिंगणे हे पती पत्नी वारंवार आमचे घरी येवुन आमच्याशी भांडण करुन मला आणि माझ्या मुलगा रामेश्वर यास शिविगाळ करुन जिवे मारण्याच्या धमक्या देत होते. त्या कारणावरुन माझा मुलगा रामेश्वर ह्याने मागील ४-५ महीन्यापुर्वी त्यांच्या त्रासाला कंटाळुन तलवाडा गावातील गणपती मंदीराजवळील आसलेल्या लिंबाच्या झाडाला फाशी घेण्याच्या प्रयत्न केला होता. त्यावेळी गावातील ग्रामस्थांनी त्याला वाचवले होते. परंतु लक्ष्मण शिंगणे आणि मनिषा शिंगणे हे आमच्या भावकीतील असल्याने आम्ही पोलीसात न जाता त्यांना समजावुन सांगुन आपसात मिटवुन घेतले होते. परंतु दि.३१/०१/२०२६ रोजी रात्री ०९.०० वाजेनेच्या सुमारास मी माझ्या घरी असतांना माझा मुलगा रामेश्वर हा मला म्हणाला की, सायंकाळी ०५.०० वाजेच्या सुमारास मी तुळजा भवानी मंदीराजवळ ओट्यावर बसलेलो असतांना त्याठिकाणी लक्ष्मण शिंगणे आणि मनिषा शिंगणे हे दोघे तेथे आले व त्यांनी मंदीराचे पुजारी भक्तीदास रायते यांची सुन मनिषा दिपक रायते हीच्यासोबत वाद घातला व मला शिवगाळ करुन मारण्याची धमकी दिली असे सांगितले. त्यावेळी मी रामेश्वर यास म्हणाले की, आपण सकाळी त्यांचे घरी जावुन त्यांना ▶▶ उर्वरित पान २ वर

### बीड शहरातील डॉक्टर, प्राध्यापक, वकील शिक्षक आणि विविध कर्मचाऱ्यांच्या वतीने....

# अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण !

### प्रत्येक नागरिकांनी वेळेचे बंधन पाळणे हीच अजित दादा पवार यांना खरी श्रद्धांजली ठरेल – प्रा. सत्येंद्र पाटील

बीड । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या समाजकार्यात राजकारणात एवढेच नव्हे तर प्रत्येक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ही निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणारी नाही. वेळेचे काटेकोर पालन, विकासाची स्पष्ट



दृष्टी आणि निर्भीड निर्णयक्षमता हीच दादांची खरी ओळख होती. आपणही अजित दादा पवार यांच्या प्रमाणे वेळेचे बंधन पाळणे हिच अजित दादा पवार यांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली अर्पण करणे ठरेल असे प्रतिपादन प्रा. सत्येंद्र पाटील यांनी अजित दादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करताना व्यक्त केले. या बाबत अधिक माहिती अशी की, बीड शहरातील शिक्षक, प्राध्यापक, वकील, डॉक्टर व विविध कर्मचारी संघटनांच्या वतीने अजित दादा पवार यांना आदरांजली अर्पण करण्याच्या कार्यक्रम सोमवार दिनांक २ फेब्रुवारी रोजी प्रा. सत्येंद्र पाटील ▶▶ उर्वरित पान २ वर

## घरकुलधारकांनो चिंता नको; शासन मोफत वाळू वाटत आहे

### खांडे पारगाव येथे टुकूर नदीत तहसीलदार शेळके यांच्या हस्ते मोफत वाळूचे वितरण

बीड । प्रतिनिधी

घरकुल उभं राहावं , भिंतींना आधार मिळावा, गरीबाच्या घरावर वाळूचा भार न पडावा... या भावनेतून राज्य शासनाने राबविलेली मोफत वाळू वितरणाची योजना बीड जिल्ह्यात प्रभावीपणे आकार घेत असल्याचे स्पष्ट झाले आहे . राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या वाळू धोरणाची अंमलबजावणी बीड जिल्ह्यात काटेकोरपणे सुरू असून, ग्रामीण



भागातील घरकुल लाभार्थ्यांना थेट दिलासा देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न प्रत्यक्ष जमिनीवर उतरल्याचे दिसून येत आहे. छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त ▶▶ उर्वरित पान २ वर

## शिक्षणाच्या आयचा घो! दांडीबहाद्दर शिक्षकामुळे भैरवनाथ वस्ती शाळेतील विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात

### जिल्हाधिकारी, सीईओ जि.प. व शिक्षणाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार: डॉ. गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील गलथान कारभारामुळे ग्रामीण भागातील गोरगरिबांच्या मुलांच्या शिक्षणाचा खेळखंडोबा सुरू असल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे. नुकतेच कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहार प्रकरणात जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी निलंबित झाले असताना, दुसरीकडे काही शिक्षकांच्या बेफिकीर वर्तणुकीमुळे शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत



असल्याचा आरोप पालकांनी केला आहे. बीड तालुक्यातील जरुड केंद्रीय जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंतर्गत भैरवनाथ वस्ती शाळेतील मुख्याध्यापक राजेश देशमुख हे गेल्या १२ वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असून, ते नियमितपणे शाळेत गैरहजर राहत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. पालकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित शिक्षक २६ जानेवारी आणि १५ ऑगस्ट रोजी केवळ झेंडावंदनासाठी शाळेत येतात, तर इतर वेळी शाळेकडे फिरकतही नाहीत. भैरवनाथ वस्ती शाळेत जवळपास १०० लोकसंख्या असून इयत्ता पहिली ते चौथी पर्यंत वर्ग चालतात. मात्र, दुसरी आणि चौथीच्या विद्यार्थ्यांना शिकवण्याची जबाबदारी असलेल्या शिक्षकाच्या गैरहजेरीमुळे पालकांना आपल्या मुलांना २ किलोमीटर अंतरावरील जरूड येथील जिल्हा परिषद शाळेत पाठवावे लागत आहे. महिन्यातून एखाद-दोनदा येऊन हजेरी मस्टरवर सही करून निघून जात असल्याचा आरोप पालक अमोल जाधव यांनी केला आहे. या गंभीर प्रकाराबाबत डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी ▶▶ उर्वरित पान २ वर

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयाचा नखाते रोहित तात्याबा याची सीआयएसएफ मध्ये निवड



किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील इयत्ता बारावी उत्तीर्ण झालेला नखाते रोहित तात्याबा (पहाडी पारगाव) याची दुर्ग, छत्तीसगड येथे (सीआयएसएफ) सेंट्रल इंडस्ट्रियल सेक्युरिटी फोर्स मध्ये प्रशिक्षणासाठी निवड झाल्याने महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते पुष्पहार व शाल देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ▶ उर्वरित पान २ वर

## राज्याचे कौशल्यविकास मंत्री ना.मंगलप्रभात लोढा यांची कृषीकुल प्रशिक्षण केंद्रास भेट

### ग्लोबल विकास ट्रस्टचे काम शेतकऱ्यांचे जीवन उंचावणारे – ना.मंगलप्रभात लोढा

परळी वै. । प्रतिनिधी

राज्याचे कौशल्य विकास, रोजगार तथा उद्योजकता मंत्री ना. मंगलप्रभात लोढा यांनी बुधवार, दिनांक ०४ रोजी ग्लोबल विकास ट्रस्टच्या कृषीकुल प्रशिक्षण केंद्रास भेट दिली. संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी, ट्रस्टी संजय परमार तसेच सर्व कृषीकुल कृषी सेवकांच्या वतीने स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी ना.लोढा यांनी ग्लोबल विकास ट्रस्टच्या संपूर्ण कामकाजाची माहिती घेऊन, शेतकऱ्यांसाठी



अतिशय उपयुक्त असे कामकाज होत असल्याबाबत कामाचे कौतुक केले. मराठवाड्यातील शेतीला तांत्रिक जोड मिळायला हवी, शेतकऱ्यांना नवनव्या तंत्रज्ञानाची माहिती व्हायला हवी आणि युवा शेतकऱ्यांनी नव्या उत्साहाने शेतीकडे भविष्य म्हणून पाहावे यासाठी त्यांनी कौशल्य पारंगत होण्यासाठी ग्लोबल विकास ट्रस्ट काम करत आहे. यासाठी राज्य सरकारकडून सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही ना.मंगलप्रभात लोढा यांनी दिली. बुधवारी ते पोहनेर येथे जोशी कुटुंबियांच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## रेड रिबीन क्लब अंतर्गत जनजागृती



किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील रेड रीबन क्लब व धारूर ग्रामीण रुग्णालयातील एड्स नियंत्रण विभागाच्या संयुक्त विद्यमाने धारूर शहरातील दुर्गम भागात तसेच शहरातील तत्सम परिसरामध्ये एड्स जनजागृतीपर फेरी काढून जनजागृती करण्यात आली. रेड रिबन क्लब मध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी घरोघरी जाऊन रेड रिबन क्लब राबवत असलेल्या विविध कार्यक्रमासंबंधीची माहिती दिली. नागरिकांना एड्स (क्षत) विषयी माहिती दिली. यावेळी महाविद्यालयातील रेड रेबन क्लबचे समन्वयक डॉ. दत्ता जाधव तसेच ▶▶ उर्वरित पान २ वर

## सामुहिक विवाह सोहळयात विवाह करणाऱ्या दाम्पत्यांना कन्यादान योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

सामुहिक विवाह सोहळयास प्रोत्साहन मिळावे या हेतूने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सन २००३-०४ या आर्थिक वर्षापासून कन्यादान योजना लागू करण्यात आलेली आहे. या योजनेची अंमलबजावणी जिल्हास्तरावर सहायक आयुक्त, समाजकल्याण, बीड या कार्यालयामार्फत करण्यात येते. सदर योजनेंतर्गत स्वयंसेवी संस्थामार्फत आयोजित केलेल्या सामुहिक विवाह सोहळयात भाग घेवून विवाह केलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दाम्पत्यांना प्रतिदाम्पत्य रु. २०,०००/- इतके अर्थसहाय्य देण्यात येते तसेच असा सामुहिक विवाह सोहळा आयोजित करणा-या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस प्रतिदाम्पत्य रुपये ४,०००/- इतके अनुदान देण्यात येते. सामूहिक विवाह सोहळयात किमान १० दाम्पत्यांचे विवाह होणे अपेक्षित आहे. व्यक्तीगत पातळीवर केल्या जाणाऱ्या विवाह सोहळयामध्ये अनाठायी खर्च होवू नये व सामूहिक विवाह सोहळ्यास प्रोत्साहन मिळावे यासाठी स्वयंसेवी संस्थानी असे सामुहिक विवाह सोहळे आयोजित करण्याचे तसेच अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील व्यक्तीना विवाह सोहळयात विवाह करण्याचे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यांनी केले आहे. सदर बाबतीत अधिक माहितीसाठी सहायक आयुक्त, समाजकल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड या कार्यालयास संपर्क साधावा.

## परमेश्वर सोळंके उत्कृष्ट संपादक मुकनायक पुरस्काराने सन्मानित

### समाजहिताच्या सकारात्मक पत्रकारितेचा सन्मान व्हायलाच हवा : डीवायएसपी अनिल कटके

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना 'मूकनायक पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात येते. त्यानुसार यावर्षी विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणारे पत्रकार, उद्योजक, डॉक्टर, वकील व व्यापारी यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये 'बीड लोकरंजन' चे संपादक परमेश्वर सोळंके यांचा उत्कृष्ट संपादक म्हणून 'मूकनायक पुरस्कार' देऊन गौरव



करण्यात आला. या पुरस्कार वितरण सोहळ्यास डीवायएसपी अनिल कटके, भाजपाचे ज्येष्ठ नेते पी. टी. चव्हाण, सानप साहेब, युवा नेते यशराज बदामराव पंडित, नगराध्यक्ष सुनील भाऊ जोंधळकर, दिलीप घोगे महाराज, महाराष्ट्र पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष बापूसाहेब हूंबरे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गलांडे सर यांनी केले. यावेळी बोलताना डीवायएसपी अनिल कटके म्हणाले की, समाजहित ▶▶ उर्वरित पान २ वर

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद; ३०५ एकर क्षेत्रात फळबाग लागवड कार्यक्रम

### राज्यासाठी पथदर्शी ठरणारा शाश्वत शेती प्रकल्प ; हर्बालाईफ व फार्मसी फॉर फॉरेस्टचा पुढाकार

बीड । प्रतिनिधी

पर्यावरणाचा समतोल राखण्यासोबतच शेतीतून मिळणारे उत्पन्न वाढविण्याच्या उपक्रमांना शासन प्रोत्साहन देत आहे. शासनाच्या शाश्वत व दीर्घकालीन उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण व्हावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध योजना राज्यात लागू केल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला विविध माध्यमातून प्रतिसाद प्राप्त झाला आहे. असाच एक शाश्वत उत्पादन देणारा फळबागेचा पथदर्शी प्रकल्प बीड जिल्ह्यात ३५० एकर क्षेत्रावर येत्या काळात साकारणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या आवाहनानुसार हरित वृक्षलागवड वाढवून शेतकऱ्यांना बळकटी देण्यासोबतच पर्यावरणीय समतोल राखण्या साठी हर्बालाईफ कंपनीने सामाजिक बांधिलकी उत्तरदायित्व अंतर्गत पुढाकार घेतला असून याला फामर्स फॉर फॉरेस्ट या संस्थेने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. या अंतर्गत जिल्हयात पडीक जमीन विकास तसेच वृक्ष लागवड आणि संवर्धन यासाठी ३०५ एकर वर फळबाग व देशी वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. यासाठी १.५ कोटी रुपये निधी देण्यात येणार आहे. याबाबत हर्बालाइफ (कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व निधी) आणि फार्मर्स फॉर फॉरेस्ट यांच्यात सहकार्य करार नुकताच झाला.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश जैवविविधतेचे क्षेत्र वाढविणे तसेच शेतकऱ्यांस दीर्घकालीन उत्पन्न देणारी फळबाग व वृक्षलागवड करण्यास प्रोत्साहन देणे हा आहे.या उपक्रमांतर्गत बीड आणि पुणे जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या पडीक, कमी कस व शेतजमिनींवर वृक्षलागवड व संवर्धनाचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यामध्ये आंबा, लिंबू, संत्रा, मोसंबी, आवळा, जांभूळ, चिंच यांसह विविध प्रकारची उत्तम कलम केलेली फळझाडे तसेच अनेक देशी वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. तसेच बागेचे योग्य व्यवस्थापन करून ▶▶ उर्वरित पान २ वर

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मार्गदर्शन–**

**र्यावरणाचा समतोल राखणे तसेच शेतकऱ्यांचे शेतीतून मिळणारे उत्पन्न वाढवणे ही सद्यस्थितीत अत्यंत महत्त्वाची बाब ठरत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात या धर्तीवर महाराष्ट्र शासनाने विविध पर्यावरणपूरक व शाश्वत शेतीविषयक उपक्रम सुरू केले आहेत. या प्रयत्नांना बळ देण्यासाठी, अधिकाधिक शेतकऱ्यांचा सहभाग वाढावा, शेतीतून मिळणारा मोबदला वाढावा, दीर्घकालीन शाश्वत उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण व्हावा आणि त्यासोबत पर्यावरण संरक्षणालाही चालना मिळावी, या उद्देशाने हा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.**